आकाशवाणी नागपूर,
प्रादेशिक वृत्त विभाग
प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)
शुक्रवार दिनांक २३ मे २०२५

ठळक बातम्या

- विकसित भारतासाठी इशान्येकडील राज्यांचा विकास आवश्यक - पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे प्रतिपादन.
- मान्सूनपूर्व पावसामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना नुकसानभरपाई मिळेल असं मुख्यमंत्र्यांचं आश्वासन.
- गडचिरोली जिल्ह्यात सीमावर्ती भागातल्या जंगलात सुरक्षादलांबरोबरच्या चकमकीत चार जहाल नक्षलवादी ठार.
- नागपूर मनपाच्या टेलिमेडिसिन सुविधेमुळे १८२१ रुग्णांना दिलासा, व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे देशभरातील तज्ज्ञ डॉक्टरांकडून मोफत उपचार.

आता सविस्तर बातम्या …….

पंतप्रधान ईशान्य

विकसित भारतासाठी ईशान्येकडच्या राज्यांचा विकास आवश्यक असल्याचं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. ईशान्येकडच्या राज्यांमधेगुंतवणुकीच्या संधी उलगडून दाखवणाऱ्या उदयोन्मुख ईशान्य भारत गुंतवणूकदार परिषदेचंउद्घाटन आज प्रधानमंत्र्यांच्या हस्ते झालं.त्यावेळी ते बोलत होते. ईशान्येकडच्या राज्यांमधेनिसर्गाचं जतन आणि संवर्धन लोकपरंपरेनं केलं असून तिथलं आरोग्यदायी वातावरण गुंतवणुकदारांसाठीएक आकर्षण असल्याचं ते म्हणाले…

*पंतप्रधान नरेंद्र मोदी)*

*हील इन इंडिया का मंत्र ग्लोबल मंत्र बने, यह हमारा प्रयास है। नॉर्थ ईस्ट में नेचर भी है और ऑर्गेनिक लाइफ स्टाइल के लिए एक परफेक्ट डेस्टिनेशन भी है। वहाँ की बायोडायवर्सिटी वहाँ का मौसम वेलनेस के लिए मेडिसिन की तरह है। इसलिए हील इन इंडिया के मिशन में इन्वेस्ट करने के मैं समझता हूँ उसके लिए आप नॉर्थ ईस्ट को जरूर एक्स्प्लोरर करें।*

ईशान्येकडच्या राज्यांमधे पायाभूत सोयीसुविधांचा विकास झाला असल्याचं ईशान्यक्षेत्र विकास विभागाचे केंद्रीय मंत्री ज्योतिरादित्य शिंदे यांनी सांगितलं. या परिसरात १७ विमानतळ आणि दोन हजाराहून अधिक विमान उड्डाण सेवा उपलब्ध असल्याची माहिती त्यांनी दिली.

अमित शाह

केंद्रीय गृह  आणि सहकार मंत्री अमित शाह यांची येत्या **26** मे  रोजीची नागपूर भेट आणि दरम्यान आयोजित होणाऱ्या विविध कार्यक्रमांच्या तयारी संदर्भात विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी यांनी काल आढावा घेतला. अमित शाह यांचे **25** मे रोजी रात्री डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळ नागपूर येथे आगमन होणार आहे. शाह यांच्या हस्ते **26** मे रोजी नॅशनल कॅन्सर इन्स्टिट्यूट येथे ‘स्वस्ति निवास’ भूमिपूजन आणि चिचोली येथे नॅशनल फॉरेन्सिक सायन्स युनिर्व्हसिटीच्या कॅम्पसचे भूमिपूजन होणार आहे. या कार्यक्रमाची संपूर्ण तयारी आणि  यासाठी शासकीय यंत्रणा आणि  आयोजक संस्था यांच्या तयारीचा आढावा घेवून बिदरी यांनी यावेळी आवश्यक सूचना दिल्या.

महावितरण परिमंडल

राज्याचे मुख्यमंत्री  देवेंद्र फडणवीस यांनी विविध  दहा विषयांवर शंभर दिवसांचा राज्यस्तरीय कार्यालयीन सुधारणा कार्यक्रम घोषित केला होता. यात  राज्यातील सरस ठरलेल्या कार्यालयांच्या स्पर्धेचा निकाल जाहीर करण्यात आला. यामध्ये महावितरणच्या परिमंडल कार्यालयांमध्ये नागपूर परिमंडल कार्यालयाने प्रथम तर प्रादेशिक कार्यालयांमध्ये नागपूर प्रादेशिक कार्यालयाने  तृतीय क्रमांक पटकावला. हा उपक्रम राज्यातील सर्व शासकीय कार्यालयांमध्ये राबविण्यात आला. सर्व शासकीय विभागांच्या प्रत्येक विभागातील उत्कृष्ट तीन कार्यालयांची घोषणा नुकतीच करण्यात आली. या स्पर्धेसाठी वेबसाइट सुधारणा, कार्यालयीन सोयीसुविधा, स्वच्छता, तक्रार निवारण, सुलभ जीवनमान, गुंतवणुकीस चालना, तंत्रज्ञानाचा वापर आदी निकष होते

.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

राज्यात अवकाळी पावसामुळं झालेल्या नुकसानीचे पंचनामे करुन नुकसानभरपाई देण्यात येईल, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं. कोल्हापूर इथं त्यांनी प्रसार माध्यमांशी संवाद साधला. पुण्यातील वैष्णवी हगवणे प्रकरणात पोलीस योग्य ती कारवाई करतील, असं ते म्हणाले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आज कोल्हापूर आणि सांगली दौऱ्यावर आहेत. मुख्यमंत्र्यांच्या हस्ते इचलकरंजी इथं विविध विकासकामांचं उद्घाटन, लोकार्पण आणि भूमीपूजन करण्यात आलं.

निर्बंध

पाकिस्तानसोबतच्या युद्धानंतर देशांतर्गत सुरक्षेवर लक्ष केंद्रित असून यवतमाळ जिल्ह्यात ड्रोन द्वारे हल्ला होण्याची शक्यता आहे, त्यामुळे जिल्ह्यात ड्रोन अथवा मानवरहित हवाई यंत्र याचा वापर करण्यावर निर्बंध घालण्यात आले आहे.काल  रात्री १२ वाजतापासून ही बंदी ३ जूनच्या दुपारी १२ वाजेपर्यंत कायम राहणार आहे. राष्ट्रीय सुरक्षेच्या स्थळांना धोका निर्माण होऊ शकतो, तसेच सार्वजनिक शांतता भंग होण्याची शक्यता आहे. अशा उपकरणांचा अनियंत्रित वापर टाळण्यासाठी ड्रोन आणि  मानरहित हवाई यंत्र उडविण्यास बंद घातली आहे.

चार नक्षलवादी ठार

गडचिरोली जिल्ह्यात भामरागड तालुका आणि छत्तीसगड राज्याच्या सीमावर्ती भागातल्या जंगलात आज नक्षलवादी आणि पोलिसांत चकमक झाली. या चकमकीत चार जहाल नक्षलवादी ठार झाले. भामरागड तालुका आणि छत्तीसगड सीमेवर कवंडे गावात नक्षलवादी लपून असल्याची माहिती मिळाल्यावरुन संयुक्त शोध मोहिम सुरू होती. त्या दरम्यान आज सकाळी  नक्षलवाद्यांनी पोलिसांवर गोळीबार केला. प्रत्युत्तरात सुरक्षा दलांनी केलेल्या गोळीबारात चार नक्षलवादी मारले गेले. चकमक सुमारे दोन तास सुरू होती. चकमक थांबल्यानंतर घटनास्थळाची पाहणी केली असता मोठा शस्त्रसाठा हाती लागला. दरम्यान, मारले गेलेले नक्षलवादी हे उपकमांडर दर्जाचे असून अद्याप त्यांची ओळख पटली नसल्याची माहिती पोलिस अधीक्षक नीलोत्पल यांनी दिली. छत्तीसगडच्या सुकमा जिल्ह्यात किस्ताराम इथं नक्षलवादी आणि सुरक्षा दलात काल संध्याकाळी झालेल्या चकमकीत एक नक्षलवादी मारला गेला.

टेलिमेडिसिन

दिल्ली, मुंबई, हैदराबाद, गुरुग्राम, हसीमारा, अहमदाबाद, सुरत या शहरातील विविध आजारांचे तज्ज्ञ डॉक्टर नागपूर मानपच्या टेलिमेडिसिनद्वारे सेवा देत आहेत. आतापर्यंत गोरेवाडा नागरी प्राथमिक केंद्रातून ९४८ आणि जागनाथ बुधवारी नागरी प्राथमिक केंद्रातून ८७३ रुग्णांचे टेलिमेडिसिनद्वारे उपचार करण्यात आले आहे. मागील तीन महिन्यात दोन्ही टेलिमेडिसिन केंद्रांवरुन १८२१ रुग्णांचे निदान करुन त्यांच्यावर आवश्यक उपचार करण्यात आले आहे तर काहींवर उपचार सुरु आहेत. मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ.अभिजीत चौधरी यांनी शहरातील गोरगरीबांना मोफत दर्जेदार सुविधा मिळण्यासाठी घेतलेला हा पुढाकार जनतेसाठी संजीवनी ठरत आहे. अतिरिक्त आयुक्त वसुमना पंत आणि वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ.दीपक सेलोकर यांच्या नेतृत्वात आता शहरातील प्रत्येक झोनमध्ये एका नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये टेलिमेडिसिनची सुविधा निर्माण होणार आहे.

राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण

राष्ट्रीय नमुना सर्वेक्षणाला **75** वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त, राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालय, सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालय, भारत सरकारच्या राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांकडून आज सकाळी **10.00** वाजता सीजीओ कॉम्प्लेक्स, सेमिनरी हिल्स, नागपूर येथे एक बाईक रॅली आयोजित केली होती. या रॅलीमध्ये राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयाने केलेल्या देशव्यापी सर्वेक्षणांबद्दल सामान्य जनतेमध्ये जागरूकता निर्माण केली गेली. राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयाचे उपमहासंचालक श्रीनिवास उप्पाला यांच्या हस्ते या रॅलीचे उद्घाटन झाले. बाईक रॅली दरम्यान, अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी पोस्टर्स, बॅनर आणि घोषणांच्या माध्यमातून जनजागृती करण्याचा प्रयत्न केला. कार्यक्रमात एल.एम. जडेजा, संचालक (आंचलिक कार्यालय), रंगा श्रीनिवासुलु, संचालक (क्षेत्रिय कार्यालय), आणि सहाय्यक संचालक आणि राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालय, नागपूरचे सर्व अधिकारी आणि कर्मचारी यांनी सक्रिय सहभाग घेतला.

अजित पवार

राज्याच्या आणि देशाच्या विकासात सहकार क्षेत्राचा मोठा वाटा आहे. स्पर्धेच्या युगात टिकण्यासाठी सहकार क्षेत्रातही काळानुसार बदल करणे आवश्यक असून

सहकार चळवळ टिकण्यासाठी आणि वाढण्यासाठी आवश्यक सहकार्य करु, अशी ग्वाही राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली.

देवी अहिल्याबाई होळकर जयंती

लोकमाता देवी अहिल्याबाई होळकर यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त रविवार, २५ मे रोजी इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट नागपूर येथे "तत्वज्ञानी राणी देवी अहिल्याबाई होळकर" या विषयावर एक दिवसीय राष्ट्रीय परिषद आयोजित केली जाईल. देवी अहिल्याबाई स्मारक समिती, नागपूर, मिथिक सोसायटी, बेंगळुरू, आयआयएम नागपूर, डब्ल्यू.ई.एस.श्रीमती मनोरमाबाई मुंडले कॉलेज ऑफ आर्किटेक्चर, नागपूर आणि महाराष्ट्र राष्ट्रीय कायदा विद्यापीठ, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम आयोजित केला आहे. केंद्र सरकारच्या माजी केंद्रीय मंत्री स्मृती इराणी यांच्या उपस्थितीत एक विशेष स्पॉटलाइट सत्र होईल. समारोप समारंभात केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहतील. राष्ट्र सेविका समितीच्या अखिल भारतीय सहकारीवाहिका चित्रा जोशी, सन्माननीय अतिथी म्हणून उपस्थित राहतील.

नुकसान प्राथमिक अहवाल

वादळी वाऱ्यासह मान्सूनपूर्व पावसाच्या तडाख्यात गेल्या १९ ते २२ मे या कालावधीत अकोला जिल्हयातील सातही तालुक्यांतील १५७ गावांतील ९०९.३२ हेक्टर क्षेत्रावरील पिकांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अहवाल जिल्हाधिकारी कार्यालयाकडे प्राप्त झाला आहे. काल हा अहवाल जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत अमरावती विभागीय आयुक्तांकडे पाठविण्यात आला आहे.

हवामान

येत्या काही तासात विदर्भातील चंद्रपूर, गडचिरोली, यवतमाळ आणि वाशीम या जिल्हयात वादळीवारे आणि विजांसह हलका पाऊस पडण्याची शक्यता नागपूरच्या प्रादेशिक हवामान विभागाने व्यक्त केलं आहे.

*****